जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांना मंत्रालयीन अवर सचिव पदाची वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : सैकवि-२०१७/(प्र.क्र.१३९/१७)/२८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १५ सप्टेंबर, २०१७

<u>वाचा:-</u>

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:रासौमं-१०८९/प्र.क्र.५४/८९/२८, दि.२६ नोव्हेंबर, १९९७.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:सैकवि-२००२/२७५७/प्र.क्र.३००/२००२/२८, दि.१९ सप्टेंबर,२००५.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:सैकवि-२००८/प्र.क्र.३१२/का-२८, दि.०७ मे, २०१०.
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:सैकवि-२०१४/९८४/ (प्र.क्र.३४१/१४) /२८, दि.२४ फेब्रुवारी, २०१५.
५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:सैकवि-२०१४/९८४/ (प्र.क्र.३४१/१४) /२८, दि.१३ मे, २०१५.
६) संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांचे क्र.१२०७८/सैकवि-२/२६००, दि.०५/१०/२०१५ चे पत्र.
७) संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांचे क्र.१२०७८/सैकवि-२/३३५६, दि.१०/०८/२०१६ चे पत्र.
८) संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांचे क्र.१२०७८/सैकवि-२/२११३, दि.२२/०६/२०१७ चे पत्र.

शासन निर्णय:-

सैनिक कल्याण विभागाच्या अधिपत्याखालील, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, गट-अ या पदांना पदोन्नतीची संधी उपलब्ध नसल्यामुळे संदर्भाधीन अ.क्र. (१) येथील दिनांक २६/११/१९९७ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, गट-अ या संवर्गातील रुपये ७४५०-११५०० (सुधारित वेतनश्रेणी रु.९३००-३४८००) या वेतनश्रेणीतील एकूण पदसंखेच्या १/३ अथवा जास्तीत जास्त आठ पदांची मंत्रालयीन अवर सचिव पदाच्या रुपये १००००-११५०० (सुधारित वेतनश्रेणी रु. १५६००-३९१००) या वेतनश्रेणीती श्रेणीवाढ करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार संदर्भाधीन अ.क्र. (४) व (५) येथील दि.२४ फेब्रुवारी, २०१५ व दि.१३ मे, २०१५ च्या शासन निर्णयानुसार श्रेणीवाढ केलेल्या ८ जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांपैकी तीन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी नियत वयोमानानुसार सन २०१५ ते २०१६ या कालावाधीत सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या पदांवर जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी संवर्गातील सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या पदांवर

जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी संवर्गातील खाली नमूद अधिकाऱ्यांना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या दिनांकापासून मंत्रालयीन अवर सचिव पदाची वेतनश्रेणी (वेतनश्रेणी पीबी-३, रु.१५६००-३९१०० व ग्रेड पे रु.६६००/-) पूर्वलक्षी प्रभावाने मंजूर करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	**जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्याचे नाव.**	**अवर सचिव पदाची वेतनश्रेणी लागू केल्याचा दिनांक.**
१.	माजी फ्ला. लेप्टनंट धनंजय यशोधन सदाफळ	दि.०१/०९/२०१५
२.	माजी लेप्टनंट नितीन जगदिशचंद्र पांडे	दि.०१/११/२०१५
३.	माजी लेप्टनंट कमांडर मिनल मधु पाटील	दि.०१/०८/२०१६

माजी मेजर भानुदास संभाजी जरे हे दिनांक ३१/०५/२०१५ रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे व त्यांच्या सेवानिवृत्ती दिनांकापर्यंत अवर सचिव वेतनश्रेणी पद रिक्त नसल्याने त्यांना अवर सचिव पदाची वेतनश्रेणी अनुज्ञेय नाही.

२. याबाबत होणारा खर्च, "मागणी क्रमांक ए-५ लेखाशीर्ष, २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, ६०-इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम, २००-इतर कार्यक्रम, (००) (०२) जिल्हा सैनिक कल्याण कार्यालये (२२३५ ००४२) ०१ - वेतन" आणि "मागणी क्रमांक ए-५ लेखाशीर्ष, २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, ६०-इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम, २००-इतर कार्यक्रम, (००) (०३) सैनिक कल्याण विभाग (२२३५ ००५१) ०१ - वेतन" या लेखाशिर्षामधून सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षाकरिता मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०९१५१७३२५९१९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Suresh M. Khade
Date: 2017.09.15 17:23:14 +05'30'

(सु. म. खाडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (मासैक) यांचे खाजगी सचिव.

२. मा. राज्यमंत्री (मासैक) यांचे खाजगी सचिव.
३. प्रधान सचिव व वि.चौ.अ.(१) यांचे स्वीय सहाय्यक.
४. संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे.
५. महालेखापाल-(लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
६. महालेखापाल-(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
७. महालेखापाल-(लेखा परिक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
८. महालेखापाल-(लेखा परिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
९. वित्त विभाग, (व्यय-४), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१०. माजी फ्ला. लेप्टनंट धनंजय यशोधन सदाफळ, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी,
११. माजी लेप्टनंट नितीन जगदिशचंद्र पांडे, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी,
१२. माजी लेप्टनंट कमांडर मिनल मधु पाटील, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, मुंबई उपनगर,
१३. सर्व जिल्हा सैनिक कल्याण कार्यालये,
१४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१५. निवडनस्ती का-२८ (२ प्रती).